E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# वि. वा. शिरवाडकरांची मराठी भाषेविषयी भूमिका

**प्रा. गणेश विठ्ठल मोताळे**
सरस्वती क. म. वि. पिंगळी रोड परभणी.

## प्रस्तावना:

वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आपण 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करतो. त्या दिवशी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करून त्यांच्या विचारांची उजळणी केली जाते. त्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी मौलिक विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, मराठी भाषेला प्रत्यक्ष राज्यकारभारामध्ये योग्य स्थान मिळत नाही, आणि त्यामुळे भाषेचा अभिमान टिकविणे आवश्यक आहे. भाषा ही संस्कृतीशी निगडित असल्यामुळे मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता यांचे घट्ट नाते आहे. भारतातील राज्यांची निर्मिती प्रामुख्याने भाषावार झाल्यामुळे भाषा हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे.

डॉ. उषा खंदारे यांनी शिरवाडकरांच्या भूमिकेचा उल्लेख करताना म्हटले आहे, "जे लोक मराठी भाषेचा वापर करत नाहीत, मराठी संस्कृतीला दुय्यम स्थान देतात, त्यांनी संस्कृतीचे मारेकरी म्हणून ओळखले पाहिजे." यावरून असे दिसते की, भाषा समृद्ध करणे ही प्रत्येक मराठी भाषिकाची जबाबदारी आहे. शिरवाडकरांचे मत होते की, ज्या भाषेला राजभाषेचा सन्मान प्राप्त आहे, ती राज्याच्या शासनव्यवस्थेची भाषा असली पाहिजे. मात्र, मराठी भाषेबाबत शासकीय पातळीवर पुरेसा प्रयत्न होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील सामान्य माणसांची भाषा एक असते आणि राज्यकर्त्यांची भाषा वेगळी असते, त्यामुळे भाषेच्या संदर्भात गोंधळ निर्माण होतो.

## मराठी भाषा आणि लोकशाही:

शिरवाडकरांच्या मते, मराठी भाषेचा वापर शासकीय आणि अन्य व्यवहारांमध्ये वाढवावा. राजभाषेची प्रतिष्ठा वाढल्यास लोकशाही अधिक सशक्त होईल. राज्याच्या स्वातंत्र्याला आणि लोकशाहीला मराठी भाषेचा योग्य दर्जा मिळाल्याशिवाय ती अपूर्ण राहील. आजच्या लोकशाही व्यवस्थेमुळे राजसत्तेशी प्रत्यक्ष संबंध असणारा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. त्यामुळे भाषेसंदर्भात केंद्र सरकारने ठोस निर्णय घेतल्याशिवाय राज्य सरकारांना स्वतंत्रपणे पुढे जाण्यास मर्यादा येतात.

महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेतील परकीय शब्दांना पर्याय निर्माण करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. परंतु, शिरवाडकरांच्या मते, त्या समितीच्या कार्यपद्धतीत काही त्रुटी राहिल्या. ते

म्हणतात की, "समाजभाषा आणि प्रशासनभाषा या वेगळ्या असाव्यात, हा विचार चुकीचा आहे." सरकारने केलेला हा प्रयत्न व्यर्थ ठरतो की काय, अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली आहे.

**शिक्षण आणि मराठी भाषा:**

शिक्षण हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. भाषा ही केवळ व्यक्तीच्या अभिव्यक्तीसाठीच नसून संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करते. शिरवाडकरांच्या मते, महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठामध्ये शेवटच्या टप्प्यापर्यंत मराठी भाषेचे माध्यम उपलब्ध असावे. मात्र, अनेक महत्त्वाचे निर्णय इंग्रजीत घेतले जातात, त्यामुळे समाजामध्ये विसंवाद निर्माण होतो. इंग्रजी भाषेच्या अडचणीमुळे अनेक लायक विद्यार्थी व्यवस्थेपासून दूर राहतात, असेही त्यांनी नमूद केले आहे.

**मराठी लिपी सुधारणा:**

शिरवाडकरांनी बदलत्या काळाच्या आवश्यकतेनुसार मराठी भाषेच्या लिपीत काही सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी पुढील उपाययोजना सुचवल्या :

शीर्षरेषा काढून टाकणे.

आकारदर्शक रेषा आणि खुणा नव्याने निश्चित करणे.

संयुक्ताक्षरे विलग करून नवीन खूण तयार करणे.

अनुस्वार अक्षराच्या पुढे स्वतंत्रपणे दर्शवणे.

इ, उ, ए, ऐ यांसारख्या स्वरांचे स्वतंत्र अस्तित्व ठेवणे.

या सुधारणांमुळे मुद्रण आणि टंकलेखन अधिक सोपे व सोयीस्कर होईल. तसेच, यामुळे मराठी भाषेच्या वापरात गतीशीलता येईल. प्राचीन काळात संस्कृत-प्राकृत असा भेद असल्यामुळे राज्यकारभाराची भाषा आणि सामान्य माणसांची भाषा वेगळी होती. परंतु, आता ही परिस्थिती बदलली पाहिजे, असे शिरवाडकरांचे मत होते.

**निष्कर्ष:**

वि. वा. शिरवाडकरांनी मराठी भाषेच्या संदर्भात अत्यंत सखोल भूमिका मांडली. मराठी भाषा केवळ गोडवा राखण्यासाठी नसून, तिचा योग्य वापर आणि संवर्धन करणे आवश्यक आहे. आजही त्यांच्या भूमिकेचे आकलन करून त्या विचारांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळेच मराठी भाषेचे भवितव्य उज्ज्वल राहील.

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

## संदर्भ ग्रंथ सूची

1) खंदारे उषा - महाराष्ट्रातील ज्ञानपीठ कोमात्र प्रकाशन, ठाणे प्र.आ. २०१५ पृ. १८२
2) सोनवणे सुभाष (संपा)- रुपरेषा चेरान्ट्री प्रकाशन, अमळनेर प्र. आ. १९८४ पृ १८
3) ततैय - पृ०१६
4) नाहटा विजय (संपा), तजैन - पृ. 29. 5 .
5) लोकराज्य (मासिका) माहिती व जनसंपर्क महासंचालनाहर महाराब्द्शासन, मुंबई ऑक्टोबर २०११ अंक ७, पृष्ठ २२.
6) तत्रैव - पृ. 93.